# सकाळ



'लोरियल'च्या नव्या जाहिरातीत ऐश्वर्या

पान ६



• वर्ष १०, अंक १२२ • पाने १२ + मधुरा पुस्तिका • • मुंबई • शनिवार • २९ मे २००४ • दोन रुपये • • www.eSakal.com •

# डोंबिवलीत साकारलंय 'सुपरस्पेशालिटी युनिट'

डोंबिवली, ता. २८ : ठाणे जिल्ह्यातील सुपरस्पेशालिटी युनिट असलेले ऑपरेशन थिएटर व ऑपरेशन झाल्यानंतर देण्यात येणाऱ्या अद्ययावत सुविधांचा समावेश असलेले पहिले केंद्र येथील डॉ. शरद धाकतोडे यांच्या ओॲसिस रुग्णालयात उभारण्यात आले आहे. या ऑपरेशन थिएटरचे उद्‌घाटन राज्यपालांचे सचिव सुमित मुळिक यांच्या हस्ते ६ जून रोजी करण्यात येणार आहे.

संपूर्णपणे स्टेनलेस स्टीलचा वापर करून व शून्य बॅक्टेरिया असणारी स्थिती ठेवण्यात येणारे या पद्धतीचे ऑपरेशन थिएटर मुंबईमध्येही ब्रीच कँडी, एशियन हार्ट इन्स्टिट्यूट यांसारख्या मोजक्या रुग्णालयांमध्ये आहे. मेंदूवर शस्त्रक्रिया, प्लास्टिक सर्जरी, कर्करोगाची शस्त्रक्रिया किंवा नवजात अर्भकांवर करण्यात येणारी शस्त्रक्रिया आदींसाठी सुपरस्पेशालिटी युनिटची आवश्यकता असते. महत्त्वाच्या शस्त्रक्रियांसाठी जीवजंतूंचा प्रादुर्भाव नसलेली स्टरलाईज केलेली अत्यंत शुद्ध हवा लागते. अन्यथा जंतुसंसर्ग होण्याची शक्यता असते व काही वेळा ते धोकादायकही ठरू शकते. त्यामुळे डोंबिवलीमध्ये टंडन रस्त्यावरील कॉमर्स सेंटर येथे ओॲसिस रुग्णालयात सुपरस्पेशालिटी युनिट उभारण्यात आले आहे. त्याचा ठाणे, डोंबिवली ते बदलापूर-टिटवाळा पट्ट्यातील नागरिकांना फायदा होणार आहे. सध्या या भागातील रुग्णांना गंभीर शस्त्रक्रियेसाठी मुंबईकडे धाव घ्यावी लागते.

सुपरस्पेशालिटी युनिटच्या सोयीमुळे व शस्त्रक्रियांसाठी त्या त्या क्षेत्रातील नामवंत डॉक्टर्स येण्याची सुविधा असल्यामुळे या भागातील रुग्णांना मुंबईमध्ये जाण्याचे कष्ट वाचणार आहेत. तसेच आर्थिक बचतही होणार आहे, असे डॉ. धाकतोडे यांनी सांगितले.

या ऑपरेशन थिएटरचे वैशिष्ट्य म्हणजे भिंतींना किंवा कडांना कुठेही फटी नसतात. साधे सिलिकाने भरलेले असतात. त्यामुळे जंतुसंसर्ग होणे अशक्य होते.



डॉ. शरद धाकतोडे व डॉ. वंदना धाकतोडे